महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/उ.माध्य.परीक्षा/ 3628
कोल्हापूर 416004
दिनांक - 13/10/2025

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ट महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर शाळा

**विषय** - शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून CBSE व ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र कार्यवाहीबाबत...

**संदर्भ** - राज्यमंडळ कार्यालय, पुणे यांचे क्र.रा.मं./संशोधन/3386 दि.03.10.2025 चे पत्र

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य यांना कळविण्यात येते की,

1.शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून इ.11 वी व इ.12 वी साठी CBSE/ICSE या बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्रासाठी कोणतेही आवेदन पत्रे व इतर कागदपत्रे देण्यात येऊ नयेत फक्त गुणपत्रिकाची प्रमाणित केलेली छायांकित गुणपत्रिका प्रत व विद्यार्थ्यांच्या नावाच्या यादीसह निर्धारित शुल्क रु.1000/- प्रति विद्यार्थी भरणा करुन मंडळ कार्यालयात त्वरीत जमा करावेत .

2. कनिष्ट महाविद्यालयाकडून CBSC/ICSE या विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या नावाची यादी/प्रस्ताव नुसार संबंधित कनिष्ट महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीहाय नावाची यादी तयार करुन मंडळामार्फत समकक्षताबाबत मान्यता पत्राव्दारे संबंधित कनिष्ट महाविद्यालयास कळविण्यात येईल.

3. CBSC/ICSE बोर्डाव्यतिरिक्त इतर बोर्डातील विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची प्रचलित पध्दतीने ऑनलाईन प्रणालीव्दारे आवेदनपत्र, कागदपत्रे सादर करुन योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

4. इ.12वी साठी थेट प्रवेश घेणारे CBSC/ICSE जे विद्यार्थी ऑनलाईन प्रक्रियेमध्ये येत नाही (उदा. खाजगी विद्यार्थी .17 नं. फार्म भरुन प्रवेश घेणारे विद्यार्थी, सैनिक शाळा, आश्रम शाळा इ.) अशा CBSC/ICSE विद्यार्थ्यांनी सुध्दा आवेदन पत्र व इतर कागपत्र न देता फक्त गुणपत्रीकांची छायांकित प्रत व निर्धारित शुल्क रु.1000/- भरणा करावे त्यानंतर पत्राव्दारे मान्यता दिल्याचे यथावकाश कळविण्यात येईल.

5. इ.11वी साठी प्रवेश घेणारे CBSC/ICSE विद्यार्थी वगळून **इतर बोर्डांचे** विद्यार्थी ज्यांचे ऑनलाईन पोर्टल व्दारे प्रवेश होत नाही (उदा.सैनिक शाळा,आश्रम शाळा इ.) अशा विद्यार्थ्यांनी योग्यता प्रमाणपत्र मिळणेसाठी कार्यरत प्रणाली व्दारे अर्ज करण्यात यावेत.

6. तसेच गतवर्षी म्हणजेच इ.11वी ला प्रवेश घेतलेल्या CBSC/ICSE विद्यार्थ्यांना त्यावेळी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरला नसेल व इ.12 वी साठी योग्यता प्रमाणपत्र मिळणेसाठी यादी मध्ये नाव प्राप्त होत असेल तर अशा विद्यार्थ्यांना (भारतीय विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्राचे नियमित शुल्क रु 1000 + विलंब शुल्क रु.100 व त्यानंतर म्हणजेच दिनांक 1 डिसेंबर पासून पुढे योग्यता प्रमाणपत्रासाठी यादी सादर करण्याच्या दिनांकापर्यंत प्रतिदिन

प्रती विद्यार्थी रु 20/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क आकरण्यात येईल. तसेच परदेशी विद्यार्थी यांना योग्यता प्रमाणपत्राचे नियमित शुल्क रु 1500 + विलंब शुल्क 100/-दिनांक 1 डिसेंबर पासून पुढे योग्यता प्रमाणपत्रासाठी यादी सादर करण्याच्या दिनांकापर्यंत अतिविलंब शुल्क प्रतिदिन प्रती विद्यार्थी रु.20/- याप्रमाणे शुल्क आकरण्यात येईल.)

7. कनिष्ट महाविद्यालयाकडून CBSC/ICSE प्राप्त विद्यार्थ्यांच्या नावाच्या यादीमध्ये इतर बोर्डाचे विद्यार्थ्यांचे नाव समाविष्ट करण्यात येवू नये खाली नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे कनिष्ट महाविद्यालयाकडून महिती भरुन गुणपत्रिका प्रमाणित केलेली छायांकित प्रत देण्यात यावी.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | इ.11वी प्रवेशाचे वर्ष किंवा इ.12 वी प्रवेशाचे वर्ष | इ.10वी/इ.11वी उत्तीण झालेल्या मंडळाचे/बोर्डाचे नाव | गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडली आहे/नाही | भरण्यात आलेले शुल्क रु |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

8. ज्या CBSC/ICSE विद्यार्थ्यांच्या नावांची विहित नमून्यातील यादी कनिष्ट महाविद्यालयाकडून मंडळ कार्यालयाकडे निर्धारित शुल्कासह देण्यात आली आहे. अशा विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र देण्यात येणार नसल्यामुळे संबधित विद्यार्थ्यांस परीक्षेची आवेदनपत्रे भरताना योग्यता प्रमाणपत्राचा क्रमांक देता येणार नाही.

9. मागील वर्षी ज्यांनी योग्यता प्रमाणपत्र घेतलेले आहे परंतु डाऊनलोड करायचे राहून गेले आहे त्यांना वेबसाईटवर 2025 मधील सर्व योग्यता प्रमाणपत्राचे नंबर सर्व कनिष्ठ महाविद्यालयासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 16-10-2025 16:33:56

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत-माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. शिक्षण उपसंचालक
कार्यालय हत्ती महल रोड कोल्हापूर